सकाळ

## सिटी इंटरनॅशनल स्कूलमधील विद्यार्थी अव्वल

वानवडी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूलमधील बारावीची परीक्षा दिलेले ९८ टक्के आणि दहावीची परीक्षा दिलेले १०० टक्के विद्यार्थी सीबीएसईच्या परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. बारावीच्या २३ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा जास्त गुण आहेत. तर ४१ विद्यार्थी विशेष श्रेणीसह उत्तीर्ण झाले आहेत. २३ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी मिळाली आहे. शाळेतील ध्रुव साधळे (९७.२ टक्के), भव्या जैन (९५.८ टक्के), नेमिल कामदार (९५.४ टक्के) गुण मिळवीत अव्वल आले आहेत. शाळेतील दहावीच्या १७ विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांपेक्षा जास्त, तर ३७ विद्यार्थ्यांना विशेष श्रेणी मिळाली आहे. १७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. सिद्धांत पाटील (९८.८ टक्के), रिशी शेट्टी (९५.८ टक्के), श्रेण्या शर्मा (९५.६ टक्के) यांनी घवघवीत यश मिळविले आहे.

Pune, Main
23/07/2022 Page No. 7

लोकमत

## सिटी इंटरनॅशनल स्कूलचा शंभर टक्के निकाल

**पुणे** : वानवडी येथील सिटी इंटरनॅशनल स्कूलचा सीबीएसई बोर्डाचा दहावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे. सिद्धांत पाटील या विद्यार्थ्याने ९८.८% गुण मिळवले असून, तो शाळेत प्रथम आला आहे.

परीक्षेस बसलेल्या एकूण ७८ विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थी ९०% च्या वर गुण मिळवून गुणवत्ता यादीत आले आहेत. तर ३७ विद्यार्थ्यांना डिस्टिंक्शन मिळाले आहे, तसेच १७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. श्रेण्या शर्मा व अपेक्षा जोशी ह्या विद्यार्थिनींनी विज्ञान या विषयात आणि सिद्धांत पाटील याने गणितात पैकीच्या पैकी गुण मिळवून शाळेचे नाव उंचावले आहे. विद्यार्थ्यांचे, पालकांचे व शाळेचे अध्यक्ष मौलिक दीक्षित यांनी अभिनंदन केले आहे. शाळेतील ५ विद्यार्थी खालीलप्रमाणे - सिद्धांत पाटील ९८.८, रिशी शेट्टी ९५.८, श्रेण्या शर्मा ९५.६, अपेक्षा जोशी ९५, कौस्तव सेनगुप्ता ९३.६.

Hello Pune
Page No. 5 Jul 24, 2022
Powered by: erelego.com